# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ३१/१२/२०२४ अनु.क्र. २३८

**(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)**

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.
- जातीयसलोखा वाढविणे.
- संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/आंजिब हजर पो.अ.परभणी/१११०५/२०२४ अमरावती शहर दिनांक २३/१२/२०२४**

संदर्भ :- (१) या कार्यालयाचे पत्र क्र.पोआअ/आस्था-१/आंजिब-स्विकृती/१०२७२/२०२४, दि.२९.११.२०२४

(२) पोलीस अधिक्षक,परभणी यांचे आदेश आस्था१/२/आंजिब/पो.अम./कार्यमुक्त/ २०२४, ७२७ दि.११/१२/२०२४

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना या कार्यालयाचे संदर्भीय क्र. १ अन्वये आंतरजिल्हा बदली अंतर्गत विनंतीवरुन पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथे स्विकृती देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पोलीस अधिक्षक,परभणीयांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना बदलीवर हजर होण्यास दिनांक ११/१२/२०२४ चे मा.नंतर कार्यमुक्त केले आहे. पोलीस स्टेशन नावामोढा यांचा कार्यमुक्त पत्र जा.क्र.४५६१ दि.१७/१२/२०२४ अन्वये त्यांना दिनांक १८/१२/२०२४ मा.नंतर हजर होणे करीता कार्यमुक्त करण्यात आले असल्याने सदर महिला पोलीस शिपाई बदलीवर हजर होण्यास आल्याने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन पोलीस शिपाई पदावर या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येत असुन त्यांची नेमणुक त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अंमलदाराचे पदनाम/ ब.क्र. व संपुर्ण नाव | मुळ घटक | कार्यमुक्त केल्याचा दिनांक | या घटकात हजर झाल्याचा दिनांक | स्विकृतीचे पद व प्रवर्ग | देण्यात आलेला नविन ब.क्र. | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मपोशि/३८६ पुजा भारत भोरगे | पोलीस अधिक्षक परभणी | १८/१२/२०२४ मा.नंतर | १९/१२/२०२४ मा.पुर्व | महिला पोलीस शिपाई एन.टि.सी | ७०३ | पोलीस मुख्यालय अमरावती शहर |

वर नमुद महिला पोलीस अंमलदार हे आंतरजिल्हा बदली अंतर्गत बदलुन आल्याने त्यांची सेवाजेष्ठता ही महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र. संकिर्ण १०१७/३८४३/प्र.क्र. ४६९/पोल-५ दिनांक २६.१०.२०१७ मधील तरतुदीनुसार वरील पोलीस शिपाई यांची सेवा जेष्ठता त्याच्या भरती वर्षात अमरावती शहर आस्थापनेवर सेवाजेष्ठतेने सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चित करण्यात येईल.

वर नमुद महिला पोलीस शिपाई यांनी प्रथम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे आमद देवुन तेथे शासकिय संरजाम घ्यावा व नंतर नेमणुकीच्या ठिकाणी हजर व्हावेत.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/पोशि-६७४ भुसकवळे/१०७६४/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/१२/२०२४**

## आदेश

**संदर्भ क्रमांक :-** १) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक पोउपआ/परि-१/कसुरी अह./३७९/२०२४, दिनांक २७/०३/२०२४

२) सहायक पोलीस आयुक्त, गाडगे नगर विभाग, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ९५३/२०२४, दिनांक १६/०३/२०२४

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ८३९/२०२४, दिनांक २७/०२/२०२४

४) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/का.दा.नो./ पोशि-६७४ भुसकवळे/३८१५/२०२४, दिनांक १२/०४/२०२४

**कसुरदारचे नाव :-** पोशि/६७४ अश्विन भुसकवळे, नेमणुकपोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुरी :-**

तुम्ही पोशि/६७४ अश्विन भुसकवळे, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्हाला दिनांक १५/०२/२०२४ रोजी पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे उजळणी कोर्स करीता पाठविण्यात आले होते. तुम्ही दिनांक २३/०२/२०२४ रोजी उजळणी कोर्स करिता हजर न राहता मद्यप्राशनचे सेवन करुन पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे जावुन पोलीस स्टेशन गाडगे नगर येथील आवरातील लोकांना बसण्याचा प्लास्टिकचा स्टुल व बसण्याचा बाकडा तोडण्याचा प्रयत्न केला व दारुच्या नशेत पो.स्टे.च्या आवारात धुमधाम केली. तुम्हाला डयुटी मदतगार व तपास मदत मधील असलेले पो.अंमलदार यांचे मदतीने नियंत्रणात आणुन ताब्यात घेतले. तुम्हाला विचारपुस केली असता तुम्ही अडखडत-अडखडत उत्तरे दिली तेव्हा तुमच्या तोडुन मद्यप्राशन सेवन केलेल्या सारखा वास येत असल्याने व तुमच्या बेशिस्त वर्तणामुळे तुम्हाला वैद्यकीय तपासणी करीता सी.आर. वन मधील पोशि/७५९ प्रशांत खरात, नेम.पो.स्टे.गाडगे नगर यांचे हस्ते सी.आर. वन मोबाईल मध्ये बसवुन मा.जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे मद्यप्राशनचे सेवनाबाबत वैद्यकीय तपासणी करीता नेण्यात आले असता तुम्ही मा.वैद्यकीय अधिकारी यांचे समोर उभे असतांना, तुम्हाला नेणारे तपासणी करीता पोशि/७५९ प्रशांत खरात हे ओ.पी.डी. मधुन केस पेपर काढत असतांना तुम्ही संधीचा फायदा घेवुन तेथुन पळ

काढला. स्टे.डा.सा. नं. ७८/२४, दिनांक २३/०२/२०२४ चे २१.२३ वा. नोंद घेण्यात आली आहे, तुमचे असे बेशिस्त बेजबाबदार, अशोभनिय व हलगर्जीपणाच्या कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा मलीन होण्याची शक्यता आहे. तसेच दारु पिण्याचे सवयीमुळे पोलीस स्टेशन हद्दीत एखादी घटना घडुन पोलीसांची जनमानसांत प्रतिमा मलीन होण्याची दाट शक्यता आहे. तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर असतांना गैरहजर राहुन तुम्ही मद्यप्राशन करुन पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे जावुन गोंधळ केला. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतनवाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का रोखण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही दिनांक १३/०४/२०२४ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा पोआअ/विचौ-२/गैरहजर/का.दा.नो.ता.प्रत/स्पष्टीकरण-अप्राप्त/पोशि-६७४ भुसकवडे/५१५४/२०२४, दिनांक २९/०५/२०२४ अन्वये स्पष्टीकरण सादर करणे करीता पत्राव्दारे एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही. तुम्हाला कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करणे करीता दोन संधी देवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नसुन तुमचे मौखीक म्हणणे मांडण्यासाठी तुम्हाला आमचे आज्ञांकित कक्षात या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/१००/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये दिनांक २५/०९/२०२४ रोजी तसेच पुन्हा बिनतारी संदेश दिनांक ०४/१२/२०२४ अन्वये दिनांक ०५/१२/२०२४ रोजी बोलाविण्यात आले असता, तुम्ही आज्ञांकित हजर झाले नसल्याने व स्पष्टीकरण सादर न केल्याने तुम्हाला प्रस्तावित कारणे दाखवा नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **"पुढील देय वार्षीक वेतनवाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखणे ही शिक्षा** देण्यात येत आहे. उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर कालावधी/पोशि-३४१ इंगळे/१०९६३/२०२४ अमरावती शहर दिनांक १८/१२/२०२४**

**संदर्भ :-** या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ गैरहजर/ का.दा.नो./ पोशि-५१८ राजिक + ३/६९३५/२०२४, दिनांक ०१/०८/२०२४

## **आदेश**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असल्याने वरील संदर्भीय क्रमांक ०१ अन्वये गैरहजर कालावधी हा असाधारण (विनावेतन) का करण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. अ. क्र. ०१ यांनी स्पष्टीकरण सादर केलेले असुन सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता स्पष्टीकरण संयुक्तीक वाटत असल्याने सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५० चे तरतुदीनुसार **अर्जित रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/३४१ सागर इंगळे | पो.मुख्या. अम.शहर | दिनांक ०६/०६/२०२४ चे १७.०० वा. गणणा पासुन दिनांक १३/०६/२०२४ चे २०.०५ वा. पर्यत गैरहजर राहिले. | दि.०६/०६/२०२४ ते दि.१३/०६/२०२४ पर्यत एकुण ०८ दिवस गैरहजर | **एकुण ०८ दिवस अर्जित रजा** |

# **भाग-३**

## **वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण**

## **संकीर्ण**

**१.पोआअ/आस्था-१/अपंग अपत्य नोंद/९५८५/२०२४ अमरावती शहर दिनांक ०४/११/२०२४**

## **आदेश**

शासन निर्णय, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५०/सेवा ४, दि.०८.१०.२०१८ अन्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या अपत्यास मानसिक विकलांगता/शारिरीक दुर्बलता असेल व असे अपत्य स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असेल तर अशा अपत्यास हयातभर कुटूंबनिवृत्तीवेन मिळण्याची तरतुद मुळ नियमात आहे. त्या अनुषंगाने शासकीय कर्मचारी ज्यावेळी सेवानिवृत्त होईल त्यावेळी त्याच्या मुळ निवृत्तीवेतन प्रदान आदेशामध्ये त्याच्या मानसिक विकलांग / शारीरिक दुर्बलता असणाऱ्या अपत्याच्या नावाचा समावेश करण्यात यावा अशी तरतुद आहे.

त्याअनुषंगाने पोलीसआयुक्त,अमरावतीशहरआस्थापनेवरीलखालीलनमुद पोलीस अंमलदार यांचे अपत्य मानसिक विकलांग/शारीरिक दुर्बल असल्याने त्याबाबतची नोंद त्यांचे मुळ सेवापटात घेणेबाबत मान्यता देण्यात येतआहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र. | नेमणूक | अपत्याचे नांव | अपंगत्वाचा प्रकार व टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | सपोउपनि/५८० गणेश गोपालराव काळे | शवाशा अम.शहर | कु.अंजली गणेश काळे (जन्म दि.१५/१०/१९९३) | Locomotor Disability (68%) |

तसेच वर नमुद पोलीस अंमलदार यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रामधील नमुद माहिती खोटी चुकीची अथवा दिशाभुलकरणारी असल्याचे निदर्शनास आल्यास ते प्रचलित नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस